# मेट्रो-३ स्टेशन परिसर नियोजन स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## रचना संसद अकॅडमीने पटकावले विजेतेपद

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २५ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसीएल) आणि ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन (ओआरएफ) यांनी मेट्रो -३ स्टेशन परिसराच्या नावीन्यपूर्ण नियोजनासाठी घेतलेल्या स्पर्धेच्या निकालात रचना संसद अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर यांनी अव्वल स्थान पटकावले.

पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांना द्वितीय आणि रचना संसद अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर (विनाअनुदानित) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्या संघांना नुकतेच एमएमआरडी येथे सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही प्रथमच यात सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती.

**एमएमआरसीएल नेहमीच नावीन्यपूर्ण कल्पना आणि नवीन संकल्पना राबविण्यात अग्रेसर असते. यामुळे भविष्यातील पायाभूत सुविधांच्या डिझाईन नावारूपाला येताना अविश्वसनीय प्रतिभेचे धनी असलेले तरुण आमच्याबरोबर कार्य करतील.**

**- अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसीएल.

मेट्रो -३ स्टेशन परिसर कसा असावा याबाबत पायाभूत सुविधांचे डिझाईन स्पर्धेसाठी सादर करायचे होते. शहरातील अभियंता आणि विद्यार्थ्यांसाठी २ टप्प्यात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण ५१ संघ सहभागी झाले होते. स्पर्धकांनी सादर केलेल्या प्रकल्पाला चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी कार्यशाळा, प्रकल्प भेट, सादरीकरण आदी सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. एकूण १६ संघांना निवडून त्यातून अंतिम ८ संघांना विविध प्रकारात पुरस्कृत करण्यात आले. प्रथम क्रमाकांच्या विजेत्याला ६० हजार रुपये रोख, द्वितीय विजेत्याला ४० हजार रुपये रोख, तर तृतीय विजेत्याला ३० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. लक्षणीय तपशील म्हणून लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट ॲण्ड डिझाईन स्टडीज यांना १० हजार रुपये, सादरीकरण गुणवत्ता म्हणून भारती विद्यापीठ यांना १० हजार रुपये, परिवर्तनीय संकल्पना म्हणून पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांना १० हजार रुपये रोख असे पुरस्कार देण्यात आले.